सन २०१९-२० करीता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी
आर्थिक सहाय्य वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२४१९/प्र.क्र.१३०/क्रीयुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०६ जुलै, २०१९

वाचा:-

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे १, दिनांक ०१ मार्च, २०१४.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.अनुवि-४९१९/(३२/१९)/अर्थसंकल्प, दिनांक ०४ एप्रिल, २०१९.
३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचे पत्र क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य(१)/२०१९-२०/का-९/९३६, दिनांक १७ जून, २०१९.

प्रस्तावना:-

राज्यातील खाजगी/शासनाच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्य शासनाच्या संबंधित विभागांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्था, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना इत्यादींना क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहित्यासाठी ७५:२५ (शासन व संबंधित संस्था) या प्रमाणात अनुदान देण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. "क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे" ही क्रीडा धोरणातील एक महत्वाची शिफारस आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करुन त्याव्दारे खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्यास चालना देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या संदर्भातील सविस्तर कार्यपध्दती दिनांक ०१.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. या योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.१०००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. उपरोक्त तरतूदीपैकी महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९ अंतर्गत रु.३३३.३३ लक्ष इतकी तरतूद संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली आहे. त्यानुसार क्रीडा व युवक संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये रामरत्न एज्युकेशन फौंडेशन, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली या संस्थेस रु.९०.०० लक्ष इतके

अनुदान बंदिस्त प्रेक्षागृहासाठी मंजुरीस्तव प्रस्तावित केल्याने सदर अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या वर्षाकरिता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्याकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून रामरत्न एज्युकेशन फौंडेशन, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली या संस्थेस रु.९०.०० लक्ष मंजुर करण्यास शासन मान्यता देत आहे. यापैकी प्रथम हप्ता म्हणून २०% म्हणजेच रु.१८.०० लक्ष (रुपये अठरा लाख फक्त) इतके अनुदान बंदिस्त प्रेक्षागृहासाठी वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(१) शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ मधील बाब क्र. ४ (अ) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्याबाबतच्या अटी व शर्ती नुसार संबंधित संस्थांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

(२) संबंधित संस्थेस अनुदान वितरित झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्रकल्पाच्या छायाचित्रासह व उपयोगिता प्रमाणपत्रासह लवकरात लवकर व कमाल १ वर्षाच्या कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा वितरित अनुदान शासनाच्या प्रचलित दंडनीय व्याज दराने अनुदान वितरित झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल, ही अट मान्य असल्याचे हमीपत्र प्रतिज्ञापत्राद्वारे संबंधित संस्थेकडून घेण्यात यावे.

(३) संबंधित संस्थेस मंजूर करण्यात आलेला निधी ७५ टक्के असून शासन अनुदानाशिवाय उर्वरीत २५ टक्के स्वहिस्सा तसेच याशिवाय होणारा अधिकचा खर्च संस्थेने करणे आवश्यक आहे. शासन अनुदान व स्वहिस्सा खर्च करुन विनियोग प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(४) संबंधित संस्थेकडून स्व:हिस्सा २५ टक्के प्रथम खर्च करुन सदर बांधकामांच्या सद्यस्थितीतील फोटो सह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(५) शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ मधील बाब क्र. ४ (अ) १२ नुसार संबंधित संस्थेने स्वहिश्याची २५% रक्कम प्रथम खर्च करुन वरील अनुक्रमांक (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा क्रीडा अधिका-याकडे विवरणपत्र सादर केल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देवून स्वत: खात्री करण्याची जबाबदारी त्यांची राहील. तद्नंतरच संबंधित संस्थेस निधी वर्ग करण्यात यावा. विहित पध्दतीचे पालन

केले नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

२. उपरोक्त अटींच्या अधिन राहून सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्याकरीता संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या संदर्भातील तरतूद संबंधित संस्थेस वितरित करताना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक ०४.०४.२०१९ च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. या योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

"मागणी क्र.ई-३ लेखाशिर्ष २२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (४०) क्रीडा सुविधा, (४०) (०१) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी सहाय्य करणे (२२०४ ५७०६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) योजनांतर्गत."

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६१४४५५७४९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.07.06 14:49:40 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)

१०. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. संबंधित उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१३. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१४. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. निवड नस्ती (क्रीयुसे-१).